# [redacted]बा आणि मी



**पुरुषांच्या बरोबरीने समानतेचे हक्क प्रत्यक्षात मिळविण्यात यशस्वी झालेल्या चिनी स्त्रियांपैकी एका भगिनीने आपल्या जुन्या खडतर जीवनाची ही कहाणी वर्णन केली आहे.**

प्राचीन काळी आमच्या बेटावर, आम्हा कोळी लोकांना छळणारी दोन जुलमी घराणी होती, आणि आख्खा मासळी बाजार कबजात असलेली तीन घरं होती. आम्ही सर्व कोळी लोक त्याना 'दोन कुऱ्हाडी आणि तीन सुऱ्या' म्हणत असू. एक गाणेही रचले होते.

इतर कुठही जा पण कॉंकॉर्ड बेटावर जाऊ नका.
कोळयांच्या नशिवी तेथे दुःख आणि सोसणुकी-
शिवाय काही नाही
दोन कुऱ्हाडी तुमच्या डोक्यावर लटकत असतात.
तर तीन सुऱ्या तुमच्या छातीवर रोखलेल्या असतात

अशा जगात माझा जन्म झाला. माझ्या पहिल्या आठवणी म्हणजे भूक, थंडीचा कडाका आणि त्या "दोन कुऱ्हाडी नी तीन सुऱ्यांविषयींची" भयंकर चीड. माझ्या कुटुंबाचं नांव ली पण सर्व लोक माझ्या बाबाना 'ली ८४' या नावानं ओळखत. जरा मठी झाल्यावर मला माझ्या आईकडून त्यांची दुःखानं भरलेली कहाणी समजली.

कितीतरी पिढयांपासून आम्ही समुद्रकिनारी रहात आलो. माझे आजी-आजोबासुद्धा जरा बरी हवा असली की समुद्रावर जात वर्षभर कष्ट करत. पण आमच्या कुटुंबाला पुरेसं अन्न व कपडालत्ता कधीच मिळाला नाही. माझे बाबा १२ वर्षांचे असताना आजोबा आजारी पडले. समुद्रावर जाणे शक्य होईना. सर्वांचीच उपासमार सुरु झाली.

आजीनं माझ्या बाबांना बाहेर जाऊन रानातील वनस्पती गोळा करून आणण्यास सांगितले. दाराजवळ बसलेल्या माझ्या बाबानी मान हलवली आणि त्याना रडून कोसळले. आजी खूप संतापली. तिने बाबाना झापले. आळशी, ऐतखाऊ, घरातील वडीलधाऱ्यांची कदर नसलेला वगैरे शब्दांनी त्यांची तासमपट्टी करून तिने एक टोपली बाबांच्या पायाजवळ भिरकावली आणि म्हणाली "चल उठ, तू काही लहान नाहीस, चांगला १२ वर्षांचा घोडा झाला आहेस." बाबा गप्पच! आणखीच मुसमुसून रडू लागले. माझी आजी हातात काठी घेऊन त्याना झोडपणार इतक्यात रस्त्यावरून गात जाणाऱ्या एकाचे शब्द कानावर पडले.

टेकडीवर कडू पान शिल्लक नाही.
आम्ही घासाची मुळं खातो पण पोटभर नाही.
(दुष्काळात अन्नासारखा वापरला जाणारा) 'मर्सो'
चिखलपण संपून गेला आहे.
आता आम्ही रानटी मुळ्या पान, देठ, गाभा चघळतो

आईला कळून चुकले. मुलगा विचारा काय आणणार? खाण्यालायक वनस्पतीसुद्धा शिल्लक राहिली नाही. काय करावं सुचेना तिला. आजारी माणसाला उपाशी तर ठेवता येत नाही. तिनं मन घट्ट केलं आणि आपल्या कोवळ्या पोराला चेन या मासळी व्यापाऱ्याकडे कामाला ठेवलं. बेटावरील दोन टग्यां-

पैकी मच्छीमार बोटीचा मालक चेन यानचा हा बाप. या कामाबद्दल माझ्या आजीला शंभर जीन म्हणजे अर्धा शेर सुक्या गोडबटाटा चकत्या मिळणार होत्या. त्या चकत्यांचे वजन घरी केले तर त्या भरल्या ८४ जीनच ! आजी खूप संतापली पण रडण्या–गागण्या-पलिकडे ती काही करू शकत नव्हती. निर्दय चेनच्या नावाने तिने बोटे मोडली. दुसरे दिवशी मुलगा कामावर जायला निघाला तेव्हा त्याला पोटाशी धरून ती म्हणाली "पोरा, आईला दोष देऊ नको. तुझे वडील खूप आजारी आहेत." बाबा म्हणाले, "आई उगीच वाईट वाटून घेऊ नको. मला कळतं ग. त्या हरामखोरासाठी काम केलंच पाहिजे असा काही मी एकटाच नाही." डोळयात पाणी आणून आजीनं बजावलं "पोरा त्यानं आपल्याला कसं फसवलं आहे हेही ध्यानात ठेव." "चांगलं लक्षात ठेवीन. जोपर्यन्त माझं नाव ली आहे तोपर्यन्त त्याचा विसर पडणार नाही." आपल्या डोळयातील पाणी लपविण्यासाठी त्यानी मान फिरवली आणि चालू लागले.

बाबा चेनच्या दुकानाच्या कौंटरवर गेले. आपल्या हातातील काठी त्यांच्या डोक्यावर टेकवत चेन म्हणाला, "अरे कासवाच्या बच्च्या, तू आलास होय, अगदी माकडासारखा बारीक दिसतोस. काम काही न करता खाण्यावर तुटून पडणाऱ्यापैकी दिसतोस. तुझ्यासारखा नमुना मी चांगला ओळखतो. काय म्हणतात रे तुला ?"

"मला ना ? ८४ जीन म्हणतात," बाबा उसळून म्हणाले.

"काय ? काय म्हणालास ? ८४ जीन ?" चेन खेकसला.

"८४ जीन गोड बटाटा चकत्या !" बाबा तिरस्कारानं बोलले. बाबाना काय म्हणायचं होतं ते चेननं जाणलं. आणि दात काढीत तो म्हणाला," आच्छा, तुझं समाधान झालं नाही काय ? अरे भिकारड्यांनो अर्ध्या सेंटचीसुद्धा तुमची लायकी नाही. ८४ हे जीन सुद्धा फारच झाले." सगळया बेटावर या दुष्ट विनोदाची परत परत उजळणी झाली आणि दुःख आणि तिरस्कारचं प्रतीक असं हे 'ली ८४' हे नाव बाबाना कायमचच चिकटलं ! ८४ जीन सुक्या गोडबटाटा चकत्या ! बस्स ! एका कोळयाच्या जीवनाची एवढीच किंमत !

माझ्या जन्मापूर्वी कितीतरी आधी आजी–आजोबा वारले. माझे आई – वडील चाळीस वर्षांचे असताना मी जन्मले. त्याना मुळीच आनंद झाला नाही उलट मी त्यांना नको होते. त्या काळात मुलींची बालहत्या करणे हे सर्व सामान्य आणि सहज मानले जाई. शेकडो वर्षांच्या सरंजामी रूढी आणि वर्गीय दडपणं यामुळे लोक मुलग्यालाच महत्व देत. जन्माला आलेलं मूल जर मुलगा असेल तर काय वाट्टेल ते करून त्याची देखभाल करत. पण कितीतरी मुलींना मात्र जन्मल्याबरोबरच पहिला श्वास घेण्यापूर्वीच पाण्याच्या टिबात बुडवून टाकत. मुलीचा जन्म म्हणजे एक दुःखद घटना असंच सर्व कुटुंबाला वाटायचं आणि मग संतापलेली एखादी आजी लगेच त्या पोरीची वाट लावत असे. माझ्या आई-वडिलांना ते धाडस झाले नाही. "असू दे बिचारी. काय व्हायचं ते होईल." माझी आई हळूवारपणे पुटपुटली. "मुलगी असली म्हणून काय झालं. आपल्याच रक्तामासाची आहे ना ती."

माझ्या आईला दूधच नव्हतं. नुसती रानटी वनस्पती आणि गोडबटाट्याची पानं खाऊन येणार तरी कसं ? तोंडात रक्त येईपर्यन्त मी दूध ओढत राही.

"पोरीची उपासमार होती आहे. कशानं तिचं पोट भरायचं." एकदा बाबा म्हणाले. मन घट्ट करून शेवटी ते आईला म्हणाले, "आता तिला जगवणं शक्य नाही. आपण आपलं तिला दूर केलेलं बरं." आईलाही तसंच वाटलं. थोडा वेळ मला कवटाळून ती रडली आणि "जवळचंच एखाद घर शोधून काढा. वरचेवर डोळे भरून पाहीन तरी मी." असं तिने आर्जवानं बाबाना सांगितलं.

बाबा भेसूर हसले आणि मला कुशीत घेऊन कितीतरी वेळ दाराशी उभे राहिले. जड मनानं त्यांनी एक लाकडी टब घेतला, त्यात मला घातलं आणि बाहेर पडले.

समुद्राला भरती आली होती. किनाऱ्यावर टब ते बोलले, "जा पोरी. वाचलीस तर तुझं मेलीस तर तू आई-बापाला दोष लावू नाहीस." मी जोरजोरानें किंचाळत होते. बाबा ळावर दगड ठेऊन उसन्या आवसानाने ओरडले. कशासाठी केकाटतीस ? ~~असलं निष्ठूर जग~~ सोडावसं वाटत नाही तुला ? जा बेटा आपल्या रस्त्यानं. हालअपेष्टा, दुःख याशिवाय या जगात तुझ्या वाट्याला काही येणार नाही !"

फिरून फिरून मागं वळून पहात बाबांनी जड पावलानं किनारा सोडला. समुद्र सरपटत किनाऱ्याकडे येत होता—टबाच्या जवळ जवळ ! माझ्या आक्रोशानं बाबाच्या हृदयात कालवा कालव झाली. एकदा तर ते धावत परत आले सुद्धा ! पण पुन्हा मनाला आवर घालून परतले.

घरी आल्यावर बाबा डोकं हातात धरून एखाद्या पुतळ्याप्रमाणे दारासमोरच्या दगडावर बसून राहिले. घरात जाऊन आईला तोंड दाखवण्याचे धाडस होईना. डोकं सुन्न झालं होतं. ल्यूकाका केव्हा जवळ येऊन उभे राहिले होते याचही त्यांना भान नव्हतं.

ल्यू काका असेच एक कोळी. म्हातारा चेन वारल्या वर त्याच्या मुलाकडे काम करत होते. ते प्रामाणिक आणि भडक डोक्याचे होते.

माझ्या बाबांचे ते जानी दोस्त. "अरे बाबा असा का बसला आहेस ? तुझा आनंद साजरा करायला मी आलो आहे." दारुची बाटली हलवत काका म्हणाले. तेव्हा कुठे बाबांचे त्यांच्याकडे लक्ष गेले.

"एका गरीब घरात मुले जन्माला आल्यावर त्यात साजरं करण्यासारखं काय आहे ? आणि आता तर मी त्या पोरीला समुद्राच्या ड्रॅगनराजाकडं पोहोचवून आलो आहे."

"काय बरळतोयस काय ? खरंच तू तसं केलंस ?' ल्यूकाका ओरडले. हातातील दारुची बाटली जमिनीवर भिरकावून त्यांनी समुद्राकडे धाव घेतली.

नुकताच तो टब पाण्यावर तरंगत होता ल्यूकाका पाण्यात शिरले आणि माझ्यासह टब किनाऱ्यावर आणला. मला घरी आणून बाबांना म्हणाले, "गरिबाचं पोर झालं तरी ते माणूसच आहे. त्याला जगू दिलं पाहिजे."

"तिला जगविण्याची माझी इच्छा नव्हती असं का तुला वाटतं ?" बाबा चिडून उत्तरले.

"कशाच्या आधारावर तिला जगवायचं ? तिच्या आईच्या अंगावर दुधाचा थेंब नाही!"

"मला कळतंय रे बाबा. रॉकला आता अंगावर तोडलं तर चालण्यासारखं आहे. त्याची आई घेईल हिला अंगावर प्यायला." बाबांच्या उत्तराची वाटही न पहाता काका मला उचलून घेऊन गेले.

(आयलंड मिलीशिया वुइमेन, लि–फु–चिंग
या कादंबरीवरून)
— अनु. लीला भोसले.

---

१९३५ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येवले नाशिक या ठिकाणी धर्मांतराची घोषणा केल्यावर ३१ मे १९३६ रोजी मुंबई येथे पुरंदरे स्टेडियमच्या जागेत धर्मांतराची भूमिका विशद करण्यासाठी परिषद घेण्यात आली होती. त्यानंतर ठिकठिकाणी धर्मांतराच्या घोषणेस पाठिंबा देण्याकरिता सभा झाल्या.

अशीच एक सभा १६ जून १९३६ रोजी दामोधर हॉलमध्ये झाली. ही सभा वेश्या, मुरळ्या, जोगती, वाघे, पोतराज व भूते यांनी स्वयंस्फूर्तीने धर्मांतरास पाठिंबा दर्शविण्याकरता बोलावली. सदरहू सभेत डॉ. आंबेडकर यांचे प्रभावी परखड व समाजाबद्दल आंतरिक तळमळ असणारे भाषण झाले.

या घटनेनंतर अनेक वेश्यांची लग्ने स्वतः बाबासाहेबांनी लावून दिली.

(आम्ही, दिपावली, १९७१)

---